जा.क्र.पोउपआ/वाह/नमुं/ २०५८ /२०२५,
पोलीस उप आयुक्त, वाहतूक यांचे कार्यालय,
खोली क्रमांक ७३२, सातवा मजला,
कोकण भवन विस्तारित इमारत,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई
दि. १७ /०९ /२०२५
दूरध्वनी क्र. ०२२–२७५६ २२८८.
E mail ID:- dcptraffic.nm@mahapolice.gov.in

## वाहतूक नियंत्रण अधिसुचना

संदर्भ:— पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक शाखा, यांचे कार्यालय, ठाणे यांचेकडील जा. क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/२१३/२०२५, दि. १६/०९/२०२५

**ज्याअर्थी** ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या क्षेत्राच्या हद्दीत जड अवजड वाहनांमुळे वर्दळीच्या वेळेमध्ये तसेच शहरातील गर्दीमुळे अनेक ठिकाणी मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे सर्व ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या क्षेत्राच्या हद्दीतील मार्गावर वाहतुक कोंडी होउ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक असल्याने, नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातून आनंद नगर चेक नाका मार्गे, बेलापूर—ठाणे रोडने विटावा जकात नाका मार्गे, पनवेल ठाणे मार्गावर रेतीबंदर पुढे पारसिक सर्कल येथे डावे वळण घेवून कळव्याच्या दिशेने, महापे नवी मुंबई मार्गे शिळफाटा (मुंब्रा वाहतूक उपविभाग) मार्गे, तळोजा नवी मुंबई येथून दहिसर मोरी मार्गे कल्याण व ठाणेच्या दिशेने शहरात येणारे तसेच ठाणे कडून पडघा, तळवली चौकी, नवी मुंबई तळोजा एम.आय.डी.सी. मार्गे नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे दिशेने येणारे सर्व प्रकारच्या जड—अवजड मालवाहतुक करणा—या वाहनांना दि. १८/०९/२०२५ रोजीपासून ते दिनांक ०२/१०/२०२५ रोजीपावेतो सकाळी ०६:०० ते रात्रौ २४:०० वाजेपावेतो वाहतुकीस बंदी केले बाबत पोलीस उप आयुक्त, वाहतुक विभाग, ठाणे शहर यांनी संदर्भान्वये वाहतुक नियंत्रण अधिसुचना आदेश जारी करण्यात आलेले आहेत.

**त्याअर्थी,** मोटार वाहन अधिनियम १९८८ व महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.—०५८९/ सीआर/ १०६१/ टीआरअे—२, दिनांक १९.०५.१९९० व क्र.एम. व्ही.ए.—१९६/८७१/ सीआर/ ३७/ टीआरअे—२, दिनांक २७.०९.१९९६ चे अधिसुचनेनूसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) आणि (४), ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी **तिरुपती काकडे, पोलीस उप आयुक्त, वाहतुक, नवी मुंबई** पुढीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे हद्दीतून ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत जाणारे सर्व प्रकारच्या जड—अवजड मालवाहतुक करणा—या वाहनांना दि. १८/०९/२०२५ ते दिनांक ०२/१०/२०२५ या कालावधीत सकाळी ०६:०० ते रात्रौ २४:०० वाजेपावेतो प्रवेश करण्यास पुर्णत: बंदी राहील. अशी अधिसुचना निर्गमित करण्यात येत आहे.**

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना ही जीवनावश्यक वाहने, पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, शासकीय वाहने, प्रवासी वाहतुक करणा–या सर्व प्रकारच्या बसेस व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु होणार नाही.

(तिरुपती काकडे) 17/9/2
पोलीस उप आयुक्त, वाहतूक
नवी मुंबई

प्रति,

संचालक, मुद्रण व लेखन सामुग्री, चर्नी रोड, मुंबई.

२/— आपणांस विनंती करण्यात येते की, सदरच्या अधिसूचनेची प्रसिध्दी करावी.

प्रत सादर :— जिल्हाधिकारी, ठाणे, रायगड, पालघर

२/— सदरच्या अधिसूचनेची प्रसिध्दी, दूरदर्शन व आकाशवाणीवर देण्यासाठी.

प्रत :— जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे

२/— सदरच्या अधिसूचनेची प्रसिध्दी करणेस विनंती आहे.

प्रत : उप प्रादेशिक परिवहन अधिकारी — वाशी, पनवेल

प्रत सादर : १. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका

२. आयुक्त, महानगरपालिका, पनवेल

३. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

४. पोलीस आयुक्त, नवी मुंबई

५. पोलीस आयुक्त, मिरा—भाईंदर वसई—विरार

६. चेअरमन, जे.एन.पी.टी.

प्रत सादर : १. अपर पोलीस महासंचालक, महामार्ग सुरक्षा पथक, म. रा., मुंबई.

२. पोलीस सह आयुक्त, वाहतुक, मुबई

३. पोलीस सह आयुक्त, नवी मुबई

प्रत: पोलीस अधिक्षक, जि. रायगड

पोलीस अधिक्षक, जि. ठाणे (ग्रामीण), पोलीस अधिक्षक, जि. पालघर

पोलीस अधिक्षक, महामार्ग सुरक्षा पथक, रायगड

प्रत: पोलीस उप आयुक्त, वाहतूक, ठाणे शहर

प्रत : पोलीस उप आयुक्त, परि. १ व २, मुख्यालय, वि.शा., गुन्हे, नवी मुंबई.

प्रत : सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, नवी मुंबई.

प्रत : सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, नवी मुंबई.

प्रत : मुख्याधिकारी, उरण नगरपालिका, उरण.

प्रत : पोलीस निरीक्षक, प्रशासन व नियोजन, वाहतूक विभाग, नवी मुंबई.

प्रत : सर्व प्रभारी युनिट अधिकारी, वाहतूक शाखा, नवी मुंबई.